## प्रकरण दुसरे

## एकोणिसाव्या शतकातील सामाजिक परिस्थिती

इंग्रजी राजवट महाराष्ट्रात सुरू झाल्यापासून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अनेक स्थित्यंतरे घडून आली. पाश्चात्य शिक्षणाच्या संपर्कामुळे आपल्या संस्कृतीकडे व धर्माकडे पाहण्याची एक नवी दृष्टी एतद्देशीयांना प्राप्त झाली. समाजामध्ये वैचारिक स्थित्यंतरे होऊ लागले.

महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक व आर्थिक जीवनात हळू हळू बदल होऊ लागला. आपल्या पारलौकिक व परंपरानिष्ठ संस्कृतीला धक्के बसू लागले. महाराष्ट्रातील एकूण सामाजिक जीवन ढवळून निघाले.

१) उत्तर पेशवाईतील महाराष्ट्र :

व्यापाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात आलेल्या इंग्रजांनी येथील पोखरलेल्या समाजाचा फायदा घेऊन आपली राजवट स्थिर करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रातील तत्कालीन सामाजिक परिस्थिती व दुसऱ्या बाजीरावाची विलासी वृत्ती याला बऱ्याच प्रमाणात कारणीभूत ठरली. पहिल्या बाजीरावाचा पराक्रम विसरून पेशवाई विलासात व ऐहिक भोगात दंग झाली होती. भोगलालसा, व्यभिचार, चोरी, लूट, जबरदस्ती यांनी सगळा महाराष्ट्र बेजार झाला होता. दुसऱ्या बाजीरावाने आपली दुष्कृत्ये लपविण्यासाठी अनेक व्रतवैकल्ये वाढवून ब्राम्हणांचे महत्त्व वाढविले होते. ब्राम्हण वर्गाकडे समाजाचे पुढारीपण होते. दान धर्म, व्रतवैकल्ये, यज्ञयाग, वर्णभेद इत्यादी कर्मकांडाने सर्व समाज बरबटलेला होता. सरदार, जहागिरदार यांचे आपापसातील तंटे, बाजीरावाशी असलेले अनेकांचे वैरत्व, त्यातून वारंवार उडणाऱ्या चकमकी, आपल्या स्वार्थासाठी सत्ताधाऱ्यांनी चालविलेली जनतेची छळणूक या सर्व गोष्टींमुळे महाराष्ट्रीय समाजात अस्थिरता निर्माण झाली होती. आणि तो पोखरून गेला होता.

पेशवाई नष्ट झाली तरी या अंमवळणी पडलेल्या गोष्टी ब्रिटिश राजवटीतही रेंगाळत राहिल्या. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार जसजसा होऊ लागला तसतसा या रूढी परंपरा, लोकसमजुती, व्यसने इत्यादी गोष्टी आपल्या दुरवस्थेला कारणीभूत आहेत याचा प्रत्यय

एतद्देशियाना येऊ लागला. त्या गोष्टींचा त्याग करण्यासाठी, त्याचे स्वरूप समजून घेण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. अनिष्ट चालीरीती, अंधश्रध्दा, वाईट सवयी यांचा समाचार घेण्यात येऊ लागला.

२) पाश्चात्य संस्कृतीचे वेगळेपण :

इंग्रज येथे येण्यापूर्वी अनेक यावणी आक्रमणे हिंदुस्थानावर झाली होती. पण त्यांचा फारसा परिणाम भारतीय संस्कृतीवर झाला नाही. इंग्रजी आक्रमणामुळे मात्र आपला संपर्क विज्ञाननिष्ठ संस्कृतीशी आला. पेशवाई जाऊन येथे इंग्रजी राजवट येणे हे केवळ राजकीय स्थित्यंतर नव्हते, तर ते मानसिक स्थित्यंतर होते. भारतीय संस्कृती ही स्थितिशील व कृषिप्रधान संस्कृती आहे, तर पाश्चात्य संस्कृती ही गतिशील व उद्योगप्रधान संस्कृती आहे. या दोन्ही संस्कृतींच्या परस्परसंबंधातून अनेक नवीन विचार उदयाला आले. इंग्रजी राजवटीमुळे महाराष्ट्रात विविध क्षेत्रात ज्ञानाची नवीन भर पडू लागली. या नवीन ज्ञानामुळे अंधश्रध्दा कमी होऊ लागली. एक नवीन दृष्टी जनतेमध्ये निर्माण झाली. बुध्दिवादाला प्राधान्य मिळू लागले. शिक्षणाचा प्रसार होऊ लागला. इ.स.१७८४ सालीच सर विल्यम जोन्स याने एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल ` या संस्थेची स्थापना करून भारताचा इतिहास, प्राचिन अवशेष, कला, शास्त्रे आणि वाङ्मय यांच्या अभ्यासाला चालना दिली.

३) इंग्रज सरकारचे शिक्षणविषयक धोरण :

पेशवाईमध्ये मूठभर लोकांनाच शिक्षणाची दारे खुली होती. बाकी सर्व समाज अशिक्षित, अज्ञानी असा होता. शिक्षण ही राज्य-

कर्त्यांची जबाबदारी आहे, हा विचार त्यावेळी नव्हता. ग्रंथनिर्मितीची व त्याच्या प्रचाराची साधनेही मर्यादित होती. पण पेशवाईनंतर एल्फिन्स्टनची कारकीर्द सुरू झाली. येथल्या लोकांना स्वभाषेचे ज्ञान झाले पाहिजे, त्याचप्रमाणे इंग्लिश भाषेचेही ज्ञान आवश्यक आहे असे एलफिन्स्टनला वाटत होते. शिक्षणाच्या क्षेत्रात धर्माचा काडीमात्र संबंध येऊ नये असे त्याला वाटत होते. एलफिन्स्टनच्या प्रयत्नामुळे इ.स. १८२८ मध्ये मुंबई येथे पहिली इंग्रजी शाळा सुरू झाली. इंग्रजी राज्यात सुरूवातीला जुन्या पध्दतीचे संस्कृत शिक्षण देण्याच्या सोयी करण्यात आल्या. त्याचबरोबर मराठीतूनही शिक्षण देण्यास सुरूवात झाली. इ.स.१८४० मध्ये ` बोर्ड ऑफ एज्यकेशनची ` स्थापना होऊन, इंग्रजी शिक्षणास प्रारंभ झाला. नोकरीसाठी उपयोगी पडणाऱ्या या इंग्रजी विद्येचे स्वागतच झाले. सरकारने शैक्षणिक क्षेत्रात धर्मनिरपेक्षतेचे जे धोरण स्वीकारले होते, त्याचाही योग्य परिणाम जनतेवर झाला.

शिक्षणाच्या क्षेत्रात मिशनरी लोकांनीही फार मोठी कामगिरी केली. अर्थात ही त्यांची कामगिरी धर्मप्रसाराच्या स्वार्थी हेतूने होत होती. निरनिराळ्या शाळा काढून आणि ख्रिस्ती धर्माच्या चांगुलपणावर भर देऊन, त्यांनी आपल्या धर्माच्या प्रसाराचे कार्य जोराने सुरू केले. पहिले मराठी व्याकरण, पहिला कोश, पहिले मुद्रणालय इ. सांस्कृतिक घडामोडींच्या पहिलेपणाचे श्रेय मिशनऱ्यांच्याकडे जाते. ख्रिस्ती मिशनऱ्यांनी शाळा, वृत्तपत्रे, दवाखाने, अनाथालये, रूग्णालये इत्यादींच्या स्थापनेत पुढाकार घेतला. धर्मप्रसाराच्या उद्दिष्टाने का होईना पण मराठी भाषेच्या व वाङ्मयाच्या विकासाला हातभार लागला. मिशनरी लोकांनी आपल्या संस्कृतीचे श्रेष्ठत्व सिध्द करण्यासाठी

हिंदू समाजव्यवस्थेवर जोराचा हल्ला चढविला. जातिभेद, बालविवाह, विधवांची दु:स्थिती इत्यादींवर त्यांनी कडाडून टीका केली. याचा परिणाम असा झाला की, सुशिक्षितांचा एक फार मोठा वर्ग, इंग्रजी राज्याचे समर्थन करणारा असा उदयाला आला. कित्येकांनी तर सरळ ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. ( बाबा पदमनजी) स्वधर्म श्रध्दा खिळखिळी झाली. या शिक्षणाचा दुसराही एक परिणाम झाला, आपल्या समाजातील विद्याविभूषित लोक आपल्या संस्कृतीतील दोष-निवारण करू लागले. ज्या सामाजिक चालीरिती, अथवा धर्मसमजुती आपल्या प्रगतीला बाधक आहेत. त्या नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू झाले. मिशनऱ्यांचे आपल्या धर्मावर होणारे हल्ले परतवून लावण्यासाठी आपल्यातील काही सुशिक्षितही पुढे येऊ लागले. स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा याबद्दलचा अभिमान जागृत होऊ लागला. रूढी, भ्रामक समजुती, गैर चालीरिती इत्यादींचे स्वधर्मावर चढलेले कीट झाडून त्यात इष्ट ते परिवर्तन घडवून आणण्याचा व स्वधर्म सुधारणेचा पुरस्कार त्यांनी आरंभिला. त्यामुळे बालविवाह बंद करणे, स्त्रियांना शिक्षण व समानतेची वागणूक देणे, आपल्या धर्मातील अनिष्ट रूढी नष्ट करणे इत्यादी विषयांवर चर्चा होऊ लागली. रूढी प्रधान हिंदू धर्मातील व समाजव्यवस्थेतील वैगुण्ये उघडी पडली. हिंदुधर्मीय विचारवंताना आपल्या धर्मातील प्रत्येक गोष्टीचा घासून पुसून विचार करण्याची वेळ आली.

अठराव्या शतकाच्या शेवटी आपला समाज वैयक्तिक, सामाजिक व राजकीय दृष्टीने खालावला होता. सर्वत्र विषमता भरून राहिली होती. या परिस्थितीतून आपली प्रगती व्हायची असेल तर, विविध विषयांच्या शास्त्राचे ज्ञान आपण संपादन केले पाहिजे असे येथील नवशिक्षितांना वाटू लागले. रा.श्री.जोग म्हणतात, " ज्ञानसंपादनाच्या या तीव्र

आणि वेमधून शिक्षित व अर्धशिक्षित अशा दोघांनीही या ज्ञानाचा प्रसार करण्याचा चंग बांधला. ज्ञानाभिवृध्दीविषयी या काळात जी आस्था आणि तळमळ व्यक्त झाली ती पाहून खरोखर आश्चर्य आणि कौतुक वाटल्यावाचून रहात नाही. विशेषत: या आधीच्या काळखंडाच्या तुलनेने हे फारच जाणवल्यासारखे आहे. ज्याला जे जमेल असे वाटले, त्याने ते लेखनविशिष्ट करून संस्कृतमधून अथवा इंग्रजीमधून मराठीमध्ये आणून सोडण्याचा प्रयत्न केला.' [१] यावरून तत्कालीन समाजात काही वर्गात ज्ञानाविषयी व लेखनाविषयी अभिरुची वाढली होती. मिशन-यांच्या टीकेमुळे समाजसुधारणेविषयी तळमळ व पोटतिडिक नवशिक्षितांमध्ये निर्माण झाली होती, धर्म आणि समाजसुधारणा या दोन क्षेत्रांमध्ये संघर्ष निर्माण झाला होता.

४) एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवन :

एकोणिसाव्या शतकात आपल्या समाजामध्ये स्त्रीला प्रतिष्ठा दिली जात नव्हती. मुलगी जन्माला येणे हे पापाचे फळ आहे, असे मानले जाई. त्यामुळे जन्मत:च तिला ठार मारण्याचे प्रयत्न केले जात. कन्याविक्रयाचे प्रकारही या समाजामध्ये रूढ होते. पैसे घेऊन मुलगी विकणे, सावकाराकडील कर्जाची योग्य मुदतीत फेड न झाल्यास मुलगी विकून पैसा वसूल करून देण्याची तत्पूर्वी चाल होतीच. या काळात लहान वयात मुलीचे लग्न केले जाई. प्रसंगी पाळण्यातही बाशिंग बांधत असत. अशाप्रकारे या समाजामध्ये बालविवाहाची प्रथा होती. पैशाच्या लोभाने म्हाता-याला मुली दिल्या जात. त्यामुळे लहानपणातच तिला वैधव्य प्राप्त होई . या विधवेला पतीबरोबर सहगमन करावे लागे. तिची इच्छा नसेल तर जबरदस्तीने तिला सती जाण्यास भाग पाडत. सती जाताना तिच्या किंकाळ्या ऐकू येऊ

नयेत म्हणून डोळ्याशी वाजवत. तिने सती जायला नकार दिला तर तिचे केशवपन करीत. अशा प्रकारे तिला संन्यस्त जीवन जगावे लागे. समाजामध्ये आणि घरामध्ये तिला कोणत्याही प्रकारचे मानाचे स्थान नव्हते. बालविवाह, बालाजरठविवाह, विधवाविवाह बंदी, केशवपन, सती जाणे इ. अनिष्ट चाली रूढ होत्या.

अ) बालविवाह व विषमविवाह :

बालविवाह व विषमविवाह यांच्या दुष्ट प्रथेमुळे तत्कालीन समाजातील स्त्रीचे जीवन केविलवाणे झाले होते. रजोदर्शन झालेली स्त्री घरात रहाणे पाप समजले जाई. त्यामुळे सातव्या आठव्या वर्षीच मुलीचा विवाह केला जाई. बालविवाहामुळे या कोवळ्या बालिकांच्यावर दुर्दैवी वैधव्याचा कटु प्रसंग येत असे. त्याचप्रमाणे विषमविवाहाचीही दुष्ट प्रथा आपल्या समाजात होती. द्रव्यलोभ, लाचारी, दारिद्र्य, आणि अज्ञान यांना बळी पडून अल्पवयीन मुलींची लग्ने म्हाताऱ्या नवरदेवासी लावली जात. बालविवाह आणि जरठकुमारी विवाह यांनी एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रात बरेच ताण निर्माण केले होते. आणि याचा परिणाम म्हणून घरोघरी संन्यस्त जीवन जगणाऱ्या अनेक बाल-विधवा आढळत होत्या. " पेशव्यांच्या तोफखान्यावरील सरदार पानसे यांच्या एकट्याच्या घरी सत्तावन्न बोडक्या होत्या "(२) जरठकुमारी विवाह म्हणजे आपल्या मुलींना मृत्यूच्या जबड्यात लोटून देण्याचे निर्दय कृत्यच होते.

ब) कन्याविक्रय :

द्रव्याच्या लोभाने कोवळ्या मुली श्रीमंत म्हाताऱ्यांना विकल्या जात. हे विधुर म्हातारेही निर्लज्जपणे अनेक लग्ने करीत. पैसे घेऊन

कोणत्याही वयाच्या वराला मुली विकल्या जात. स्वत: बाजीराव पेशव्याने ऐंशीव्या वर्षी दोन लग्ने करून, दोन कोवळ्या मुलींना बालवैधव्यात लोटले होते.(३) मुलीचे आईबाप होणे हे दुर्दैवीपणाचे द्योतक मानले जाई.

क) अनेक बायका करण्याची चाल :

अनेक बायका करण्याची चाल आपल्या देशात अतिप्राचीन आहे. श्रीमंत लोक अनेक बायका करीत. सुंदर स्त्रियांना भाळून, त्यांना पैशाची लालूच दाखवून त्यांच्याशी लग्न केले जाई. अपत्यप्राप्तीसाठीही अनेक लग्ने केली जात. महाराष्ट्रात ही चाल राजरोसपणे चालू होती. चारचार, पाचपाच बायका केल्या जात. एखादा नवीन जोडा विकत घ्यावा त्याप्रमाणे सहजपणे नवीन बायको केली जाई.

ड) केशवपन :

एकोणिसाव्या शतकात विधवा स्त्रीचे सक्तीने केशवपन केले जाई. सकेशा विधवेचे दर्शन अपवित्र समजले जात होते. पती मेल्यानंतर तिने केशवपन केले नाही तर हीनपणाचे मानले जाई. सकेशा राहणे, हा विधवेचा थोर प्रमाद मानला जात असे. `स्वैरसकेशा` असा तिचा उल्लेख केला जाई. `विधवा कबरी बंधो` या स्कंदपुराणातील वचनावरून विधवेच्या डोक्यावर जितके केस असतील, तितकी वर्षे तिच्या पतीला नरकवास घडतो. अशा वेडगळ समजुती या काळात अस्तित्वात होत्या; केशवपन केल्यामुळे ती विद्रूप दिसे. त्यामुळे तिच्याकडे कोणी पाहणार नाही आणि म्हणून तिने केशवपन केले पाहिजे, असे समजले जाई. तिला जबरदस्तीने न्हाव्यासमोर बसवले जाई आणि हा दुर्दैवी प्रसंग तिच्यावर दर महिन्याला ओढवत असे.

ई) विधवाविवाह :

एकोणिसाव्या शतकात विधवा विवाहाला बंदी होती. या रूढीभोवती लोकभ्रमाचे आणि विचित्र लोकसमजुतीचे वलय तयार झाले होते. विधवांना लग्नाची मोकळीक मिळाल्यास, एखाधा स्त्रीला आपला पती आवडला नाही, तर ती त्याला विषप्रयोग करून मारील व दुसऱ्याशी लग्न लावील असे एक मासलेवाईक कारण डॉ. विल्सन यांना एका हिंदु गृहस्थाने सांगितले होते.(४) बालविवाहाची रूढी व विधवा-विवाह बंदी या दोहोंमुळे विधवेचे जिणे दयनीय असे. कुटुंबात तिला हिडिसफिडीस करीत. कुलक्षयी म्हणून तिला माहेरचे दरवाजे बंद असत. तिला पशूसारखे राबवून घेतले जाई. तिची कशावरही सत्ता नसे. एकत्र कुटुंबपध्दतीत तिच्या तारुण्याचा गैरफायदा एखाधा वडिलधाऱ्याकडून घेतला जाई. यातून तिला मातृत्व प्राप्त झाल्यास मात्र आत्महत्येशिवाय तिला गत्यंतर नसे. वासनेच्या होणाऱ्या या कोंडमाऱ्यातून काही स्त्रिया उघड-उघड दुराचारी बनत. हिंदुसमाजातील विधवांची अशी दयनीय अवस्था होती. समाजामध्ये तिच्याबद्दल अनस्था होती. माणूस म्हणून तिला काडीमात्रही किंमत नव्हती.

विधवाविवाह बंदीमुळे अनाचाराला वाव मिळे व त्यातून भ्रूणहत्या घडत. काही स्त्रिया जात बदलून पुनर्विवाह करीत. कित्येक विधवा गुप्तपणे झाडपाल्याचे औषध खाऊन गर्भपात करीत, यात काही विधवा स्त्रिया दगावत.

सतीची क्रूर चाल :

विधवा स्त्रीने सती जाण्याची क्रूर प्रथा तत्कालीन समाजामध्ये रूढ होती. पतीसोबत सहगमन करण्याची इच्छा नसणाऱ्या स्त्रीला-

सुध्दा जबरदस्तीने सती जावे लागे. चितेवर असलेली सती ज्वाला असह्य होऊन चितेवरून पळू लागली, तर तिला बांबूने ढोसण्यात येई. तिचा आरडाओरडा ऐकू येऊ नये म्हणून ढोल-ताशे वाजवले जात. सती गेलेल्या स्त्रीला आणि तिच्या पतीला फारच पुण्य लाभते असे प्रलोभन दाखविले जाई. सती जाण्याचे हे दृश्य अंत:करणाला पीळ पाडणारे असे. वैधव्य म्हणजे तिचे पापच आहे असे समजले जाई आणि या पापातून सुटण्यासाठी तिला सती गेले पाहिजे असे मानण्यात येई.

बालविवाह, बालाजरठविवाह, विधवाविवाह बंदी, यातून विधवा स्त्रीबद्दलच्या अनेक जटिल समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यातूनच व्यभिचार, गर्भपात, भ्रूणहत्या, केशवपन, सतीची चाल, धर्मांतर इ. अनर्थांची परंपरा निर्माण झाली. इतर जातीतील लोकांनीही ब्राम्हणांच्या या रूढीचे अनुकरण करून आपल्या जातीतील स्त्रियांना दु:खात लोटले. यासर्व प्रकारामुळे एकोणिसाव्या शतकातील स्त्रीची अवस्था एखाद्या जनावरासारखी झाली होती.

इंग्रजांचे आगमन आणि स्त्री सुधारणा :

पेशवाई नष्ट होऊन इंग्रजी राजवट महाराष्ट्रात कायम झाल्यानंतर पाश्चात्य देशातील विचार प्रवाहाने एतद्देशीयांना आत्मनिरीक्षणाची दृष्टी मिळाली. इंग्रजांच्या आणि मिशनऱ्यांच्या विचारप्रभावामुळे आपल्या समाजाला, आपल्यातील उणिवांची जाणीव होऊ लागली. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसाराचा परिणाम म्हणून आपल्या समाजातील काही विचारवंत पाश्चात्याशी आपली तुलना करू लागले. स्त्रीजीवन, जातियता, विषमता इ.संबंधी लेखणीच्याद्वारे विचार प्रकट होऊ लागले. स्त्रीची दुरावस्था, तिचे समाजजीवनावर घडून येणारे

परिणाम, स्त्रीविषयक अनेक प्रश्न यांचा ऊहापोह एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या चरणापासून सुरू झाला. काही समाजसुधारकांनी आपल्या लेखणीतून या अनिष्ठ रूढीविरुध्द टीकेची झोड उठविली. स्त्री-पुरुष समानतेचा विचार येऊ लागला. त्यासाठी स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे, अशी जाणीव निर्माण झाली. शिक्षणाने डोळस झालेला समाज, स्त्रीविषयक उदार दृष्टिकोन बाळगू लागला. यातूनच वरील अनेक प्रकारच्या रूढी आणि परंपरा हळूहळू नष्ट होऊ लागल्या. स्त्रीबद्दल सहानुभूतीची जाणीव निर्माण झाली.

एकोणिसाव्या शतकातील या विचारजागृतीमुळे स्त्री-विषयक बऱ्याच प्रश्नांना वाचा फुटली. आपल्या समाजातील काही विचारवंतांना स्त्रीच्या वैवाहिक समस्यांचा विचार गंभीरपणे व्हावयास हवा असे वाटू लागले. ख्रिश्चन मिशनरी, इंग्रज राज्यकर्ते अथवा इतर पाश्चात्य लोक यांच्या सहवासामुळे, त्यांनी एतद्देशियांच्या दोषावर नेमके बोट ठेवल्यामुळे, कठोर टीका केल्यामुळे विवाहाच्यासंदर्भात आमचे सारेच काही बरोबर नाही, याची जाणीव समाजाला होऊ लागली. तत्कालीन अनेक नियतकालिकांतून अनेक समाजसुधारकांनी याबद्दलचे आपले विचार प्रकट केले. त्याचा समाजावर प्रभाव पडला. समाजात हळूहळू विचार जागृती होऊ लागली.

नियतकालिके आणि स्त्रीसुधारणा :

१ फेब्रुवारी १८४१ च्या `प्रभाकर` पत्रात या संदर्भात म्हटले आहे, `पुरुषाने सोळा वर्षांपलीकडे व स्त्रीचे दहा वर्षांपलीकडे लग्न करावे म्हणजे तेणेकरून स्त्रीस बालवैधव्य प्राप्त होणे क्वचितच घडण्यात येईल व धर्मसंरक्षण होईल.(५) लोकहितवादींनी

`बाळविवाह` या निबंधातून बालविवाहामुळे कोणकोणते धोके संभवतात त्याचे प्रांजळ विवेचन केले आहे. लहानपणी मुलांची लग्ने केल्यामुळे त्यांचा विद्याभ्यास नीट होत नाही. अकाली कुटुंब पोषणाची जबाबदारी त्यांच्यावर येते. आणि पुरूष उपजीविकेसाठी बाहेर गेल्यामुळे वयात आलेल्या त्यांच्या स्त्रिया व्यभिचार करू लागतात.

`विविधज्ञानविस्तार` मध्ये बालविवाहासंबंधी बराच ऊहापोह झाला. लग्नापूर्वी मुलामुलीस थोडे शिक्षण देण्यात यावे यासाठी अकरा-बारा वर्षांचे वय होईपर्यन्त तरी तिच्या जन्माच्या गाठी घालू नयेत.` प्रारब्ध हे भगवंताच्या हाती खरेच, पण आपण होऊन जितके तिचे बरे होईल तितके करावे.`(६) असे विचार तत्कालीन नियतकालिकांतून प्रकट झालेले आढळून येतात.

विधवाविवाहाच्या चालीविरूध्दही तत्कालीन समाजामध्ये जागृती होऊ लागली होती. विष्णुबुवा ब्रम्हचारी यांच्या `वेदोक्त-धर्मप्रकाश` (इ.स.१८५६) या ग्रंथात याबद्दल अत्यंत मौलिक आणि रोकठोक विचार प्रकट झाले आहेत. `वृध्दाने लहान मुलीबरोबर लग्न केले असता, ती मुलगी परत घेऊन तिचे लग्न तिच्या वयाच्या व गुणाच्या नियमाने जो तिच्या शरीरधर्माप्रमाणे चार वर्षाप्रमाणे पुरूष असेल, त्याजबरोबर लावून द्यावे आणि ज्या वृध्दाने असे काम केले असेल त्याला त्याच्या गुन्ह्याप्रमाणे शासन करावे व हरएक जातीची विधवा स्त्री त्याजबरोबर लागू झाली आहे असे आढळले तर त्या स्त्रीचा आणि त्या पुरूषाचा विवाह करावा.` (७) याच ग्रंथातील आणखी एके ठिकाणी विष्णुबुवांनी `विवाहाविषयी` असे म्हटले आहे. `बारा वर्षाच्या पुरूषास पन्नास वर्षांची बुढ्ढी बायको करून दिली तर ती त्या पुरूषाला आवडेल काय ? नाही आवडणार. तसेच बारा वर्षांचे पोरीला पन्नास

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

वर्षांचा बुद्धा नवरा आवडेल काय ? नाही आवडणार यास्तव तरूणीस तरूणपती असावा, आणि हा नियम मोडील त्यास शासन करावे...... आणि स्त्रीसंग ज्याला घडला आहे, त्याला पुरूषासंग न झालेली स्त्री नसावी, आणि कुमारीस ( म्हणजे विद्ययोनि न झालेलीस ) कुमार पती असावा.` (८) बालविवाह, जरठकुमारी विवाह व पुनर्विवाह या समस्यांचा विचार त्या काळात कसे वळण घेत होता याचे दर्शन घडविण्यास प्रस्तुत उतारा पुरेसा आहे.

अनेक बायका करण्याच्या चालीविरूध्द `ज्ञानोदय` पत्रातून इ.स. १८४५ च्या सुमारास विचार मांडण्यात येत होते. त्यापैकी एक लेख `प्रभाकर `पत्राने आपल्या ११ मे १८४५ च्या अंकात प्रसिध्द केला आहे. `अनेक बायका करण्याची चाल` हे त्याचे नांव असून या अनिष्ट चालीवर सरकारने कायदेशीर बंधन घालावे असे म्हटले आहे. केशवपनाच्या चालीविरूध्दही समाजाला जागृत करण्यासाठी त्या काळात बरेच लिखाण झाले आहे. लोकहितवादींनी यासंबंधी वेळोवेळी शतपत्रातून समाजाची सहृदयता जागवण्याचा प्रयत्न केला आहे. एका पत्रात ते म्हणतात -
`एखाद्या ब्राम्हणास मी जर सांगितले की, तुम्ही यज्ञोपवित घेतले आहे, हे तुमचे अखेरीचे आहे. जर हे तुमचे अंगावर तुटले तर त्या दिवशी तुम्ही त्यासहवर्तमान जाळून घ्यावे किंवा आम्ही तुमचे पांच पाट काढून तुम्हांस विद्रूप करून जन्मपर्यन्त तुमचे हाल करू व बेडकीप्रमाणे तुम्हास ठेवू. तर त्या ब्राम्हणास ते आवडेल काय ?` (९)

सतीच्या अमानुष प्रकाराला आळा असावा म्हणून बेंटिंगच्या कारकिर्दीत इ.स. १८२९ मध्ये सतीची चाल बंद करण्याचा कायदा सरकारने केला. सतीच्या या चालीविषयी लोकहितवादींच्या `शतपत्रात` ही काही विचार व्यक्त झालेले आढळून येतात. एकेठिकाणी त्यांनी म्हटले

आहे की, " जेव्हा हिंदू लोक भोळसर व पंडित सांगतात तसे ऐकणारे होते, तेव्हा सती जावे म्हणून सांगितले तेंच लोकांनी कबूल करून आपल्या सुना, मुली, बहिणी जिवंत जाळल्या. विधवा स्त्रियांची वेणी वगैरे घेऊन त्यांची हजामत करू लागले. आणि फार तर काय परंतु त्यांचा अशुभ प्रश्न दर्शनेंकरून होतो, त्यांस एकदा जेवण द्यावे व दाल करावे, म्हणजे जे प्रतिपादन करितात, ते काही युगातील राक्षस, माणसे खाणारेच समजावे "(१०)

अशा प्रकारे मिशनरी व इंग्रज यांच्या संपर्कामुळे एतद्देशीयांचा आपल्या समाजाकडे पहाण्याचा दृष्टिकोण बदलला. बाल-विवाह बंदी, विधवापुनर्विवाह, सती बंदी, केशवपन बंदी, या सारखे समाज सुधारणेच्या विचारांचा पुरस्कार केला जाऊ लागला. त्यामुळे स्त्रियांचे जीवन हळूहळू बदलू लागले.

अशा प्रकारे तत्कालीन समाजामध्ये स्त्री सुधारणेविषयी अनेक विचार प्रकट होऊ लागले होते. तरी स्त्रीची सर्वांगीण उन्नती होण्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. याची जाणीवही तत्कालीन समाजाला होऊ लागली. शिक्षणाच्या अभावी स्त्रीसमाजात कोणतेही सुधारणा घडून येणे दुरापास्त आहे हे ओळखून स्त्रीच्या शिक्षणाची गरज नेटाने प्रतिपादन करणारे लेखक पुढे येऊ लागले. खुद्द स्त्रियादेखील शिक्षण घेऊन स्वत:च आपली प्रगती करू शकतील असाही एक विचार मूळ धरू लागला. यातूनच स्त्रियांना शिक्षण द्यावे की देऊ नये हा प्रश्न निर्माण झाला.

स्त्रीशिक्षण तत्कालीन समाजामध्ये स्त्री शिक्षणाविषयी बरेच गैरसमज रूढ होते. स्त्रियांना विद्या शिकवू नये कारण व्यभिचार

7531
A

अधिक वाढेल, अशी मूर्खपणाची समजूत या काळात होती. स्त्रीला शिकवणे म्हणजे अनर्थाचे मूळ आहे. स्त्रिया शिकल्या तर पुरूषांनी काय करावे. स्त्रियांचे शहाणपण चुलीजवळ इत्यादी गैरसमज या समाजामध्ये होते.

स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज, स्त्री शिक्षक असलेल्या शाळांची आवश्यकता, मुलांना आईकडून मिळणाऱ्या शिक्षणाचे इतर प्रकारच्या त्यांना मिळणाऱ्या शिक्षणातून श्रेष्ठता इत्यादी विचार तत्कालीन समाजामध्ये प्रस्तुत होत होते. ' प्रभाकर ' पत्रामध्ये लोकहितवादींनी स्त्रियांना शिक्षण देण्याची गरज प्रतिपादली आहे. ते म्हणतात, ' आमच्या स्त्रिया अज्ञान आहेत. जोपर्यन्त आम्ही आपल्या देशांत बायकांस शहाण्या करणार नाही तोपर्यन्त आम्ही मुर्ख राहू कारण की, बायकांचे हाती प्रथम मुलांस रीतभात लावणे आहे. तेथेच जर बिघा पडला तर पुढे सुधारत नाही. ' (११)

स्त्रियांना कोणते शिक्षण द्यावे याचाही ' शिक्षालाभ ' कार हरीकेशवजी यांनी विचार केला आहे. शाळेतील शिक्षणाबरोबर शिवण, चित्रकला हे स्त्रियांना शिकवावे. त्याचप्रमाणे मधुर बोलता येण्यासाठी व्याकरण, काव्य, भूगोल, खगोल, इंग्लिश भाषा, संस्कृत भाषा, इत्यादी विषय, स्त्रियांना शिकवले जावेत असे म्हटले आहे. स्त्री शिक्षणासाठी मुलांच्यापेक्षा अधिक खर्च करावा. स्त्रीशिक्षणाची इच्छा लोकांत निर्माण व्हावी अशा तऱ्हेचे प्रयत्न करावेत. इतकेच नाही, तर स्त्री बोर्डिंगांची कल्पनाही या काळात मांडली गेली होती.

मिशनऱ्यांनी प्रथमत: स्त्री शिक्षणाचा प्रयत्न केला. त्यानंतर एतद्देशीय तरूणांनी, विशेषत: जोतिबा फुल्यांनी, पुण्यात

मुलींची शाळा काढली व स्वत:च्या पत्नीला शिकवून त्या शाळेत शिक्षिका म्हणून नेमले. या सा-या स्त्रीविषयक चळवळीबद्दल तत्कालीन समाजामध्ये टीका प्रतिटीका होत होती. त्या काळातील स्त्रिया शाळेत जाऊन शिक्षण घेऊ लागल्या. अंतर्मुख होऊन स्वस्थितीविषयी विचार करू लागल्या. काही स्त्रियांनी विशेषत: विधवांनी आपली मनोगते अत्यंत धाडसाने त्यावेळच्या वृत्तपत्रांतून मांडली. विधवेलाही भावना असतात हे सांगणारे ` विधवेचा विलाप ` या नांवाचे पत्र ` ज्ञानोदया ` ने (१५ आक्टोबर, १८५२ ) मध्ये प्रसिध्द केले.

या काळखंडातील सुधारणा स्त्रीला केंद्र मानून चालली होती. सामाजिक व धार्मिक प्रश्नाबाबत सुधारक व सनातनी यांच्यात तीव्र संघर्ष होत होता. यातून एकूण वातावरण गढूळ झाले होते. असे असले तरी, वरील सुधारकांच्या विचारामुळे लोकमानसात बराच फरक पडत चालला होता. तेजाचा एखाद दुसरा स्फुल्लिंग पेट घेत होता.

धर्मजीवन :

दुस-या बाजीरावाच्या कारकिर्दीत कर्मकांडाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले होते. व्रतवैकल्ये, नवससायास, पुजाअर्चा, अंधश्रध्दा यांवर समाजाचा विश्वास होता. अनेक अनिष्ट रूढी, परंपरा यांचे स्तोम माजले होते. एकंदरित एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीचे धर्मजीवन, ब्राह्मण वर्गाच्या स्वार्थाने आणि भ्रष्टाचाराने, बरबटलेले होते. हे धार्मिक जीवन इंग्रजी राजवटीत तसेच कायम टिकण्याची शक्यता नव्हती. पेशवाई नष्ट होण्याच्या आधीपासूनच मिशन-यांनी हिंदू धर्मातील दोषांवर टीका करायला सुरूवात केली होती. हिंदूंच्या अंगवळणी पडलेला धर्म म्हणजे ब्राह्मणांनी धूर्तपणाने इतर वर्णीयांच्यावर आपले वर्चस्व राखण्यासाठी चालवलेले एक आचाराचे रहाटगाडगेच होते. हिंदूंच्या सा-या

धर्मकल्पना म्हणजे मूर्ख-भोळसरपणाच्या आहेत. हिंदूंचे देव त्यांचे कार्य, अवतार या खुळ्या समजुती आहेत. अशी ख्रिस्ती मिशनऱ्यांनी कडाडून टीका केली. त्यामुळे आपल्या धर्मापेक्षा हा धर्म श्रेष्ठ असला पाहिजे असे एतद्देशीयांना वाटू लागले. त्याचप्रमाणे आपण प्रतिपक्षावर टीका केली नाही, तर आपला धर्म नेस्तनाबूत होईल. असे येथील काही विचारवंतांना ही वाटू लागले. त्यामुळे हिंदूधर्माचे समर्थन करण्याचे प्रयत्नही होऊ लागले. हिंदू धर्मावरील हल्ला हा प्रामुख्याने मिशनऱ्यांच्याकडून झाल्यामुळे, ख्रिस्ती धर्माबद्दलही अनुकूल-प्रतिकूल टीका होऊ लागली. त्यातून एक-प्रकारचा धार्मिक संघर्ष सुरू झाला. एकाबाजूला ख्रिस्तीधर्माचे समर्थन करणारे विचारवंत आणि लेखक जन्माला आले. ( उदा.बाबा पदमनजी, पंडिता रमाबाई) तर दुसऱ्या बाजूला हिंदू धर्माचे समर्थन करण्यासाठी अनेक धर्म पंडितांनी उदा. भाऊ दाजी लाड, विष्णुबुवा ब्रम्हचारी, आगरकर, चिपळूणकर, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, न्या.रानडे, विठ्ठल रामजी शिंदे इत्यादी विचारवंतांनी आपली लेखणी झिजविली.

शिक्षणाच्या क्षेत्रात देखील हिंदूधर्मीयांचे दोष दाखवून ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला जाई. तत्कालीन समाजामध्ये ब्राम्हणवर्गावर नेतृत्व करणाऱ्या लोकांकडूनच मोठ्या प्रमाणात टीका होत होती. धर्माच्या नावाखाली अनेक अनिष्ट रूढी समाजात रूढ करणारा, आपल्या स्वार्थासाठी इतरांना अज्ञानात ठेवणारा, अर्थशून्य विधेच्या आधाराने सामान्य लोकांना लुबाडणारा अशी ब्राह्मण वर्गावर टीका केली जात असे. लोकहितवादींनी आपल्या ' शतपत्रात ' ' ब्राम्हणाचे अज्ञान ' या विषयावर लिहिताना म्हटले आहे की, ' पेशवाईत ब्राम्हण लोकांनी फक्त जेवणाचे पदार्थ नवे कायकाय होतील व रेशमी व मरगच्च पोशाख अंगावर कुत्री भोकायाजोगे काय काय तयार होतील यांचा विचार करण्यातच मात्र वेळ घालविला. काही विधेपासून हित, मनाची सुधारणा

व राज्याचा बंदोबस्त केला नाही, हे उघड आहे. जे हिंदुस्थानात पहिले प्रतीचे ब्राह्मण त्यांवाचून दुसरे कोणी वाचू नये असे नेम आहेत. त्या ब्राह्मणांचा मूर्खपणा हा आहे. तेव्हा इतर जातींची व्यवस्था सहजच समजेल.' (१२)

धार्मिक श्रध्दांसंबंधी एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास, सुशिक्षित हिंदु कसे विचार बाळगीत असत याची कल्पना दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रावरूनही चांगली येते. या ग्रंथात तत्कालीन धार्मिक, सामाजिक व राजकीय स्थितीचे प्रतिबिंब पडलेले दिसून येते. जावऱ्याच्या नबाबाकडे इंग्रजीचे अध्यापक म्हणून दादोबा जात असताना वाटेत नाशिक येथे क्षेत्रोपाध्याय यांनी त्यांना श्राध्द करण्याचा आग्रह केला. या प्रसंगाचे वर्णन करताना दादोबा म्हणतात,' क्षेत्रविधी करण्याविषयी आमच्या उपाध्यायांचा व इतर ब्राम्हणांचा फार आग्रह पडला. परंतु मी त्यास साफ सांगितले, ' गंगाबाईत स्नान केले म्हणजे आमचे पाप जाईल किंवा येथे श्राध्द विधी केला असता आमच्या पूर्वजांचा उध्दार होईल असे आम्हास अगदी वाटत नाही व तशी आमची श्रध्दाही होत नाही. म्हणोन त्या खटपटीत तुम्ही मला घालू नका. वरकड आमच्या शक्तीप्रमाणे आम्ही तुम्हास दक्षिणा वगैरे देऊ. ब्राम्हणास आणखी काय पाहिजे ? त्यांस आमच्या किंवा आमच्या वडिलांच्या उध्दाराची थोडीच काळजी असते. त्यांस त्यांच्या पोटाची काळजी असते. त्याची थोडी सामग्री व्हावी हेच त्यास इष्ट असते. ते त्याचे इष्ट आम्ही त्यास दिले.'(१३)

वरील उताऱ्यावरून असे दिसून येते की, आपल्या पोटासाठी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी, यात्रेकरूकडून भटभिक्षुक श्राध्दपक्ष करवीत असत. मृतपितरांच्या मोक्षप्राप्तीबद्दलच्या श्रध्दा उराशी जतन करणारा, अफाट हिंदुसमाज या ब्राम्हणांचा पोशिंदा होता.

UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

आपल्या धर्मातील दोषानिवारण करण्यासाठी दादोबा पांडुरंगांनी ` मानवधर्म सभा ` स्थापन केली.(१८४४) हिंदू धर्मातील दोषांचे आविष्करण चालू असताना, हिंदुधर्माचा पक्ष उचलून धरणारे लेखनही पुढे आले. ख्रिस्तीमिशनरी हिंदुधर्माची जी निंदानालस्ती करीत तिचे भयावह परिणाम लोकांच्या प्रत्ययाला आणून देऊन सावधगिरीचा इशारा देणारे लिखान ` प्रभाकर ` पत्रात प्रसिध्द होत असे. स्वधर्मावर होणाऱ्या या हल्ल्यापासून आत्मसंरक्षणाचे उपाय सुचविणारे व अशा उपकारकप्रयत्नांचा गौरव करणारे लिखाणही बरेच निर्माण झाले. ` विचारलहरी `, ` सध्दर्मदीपिका ` इ. नियतकालिकांतून ख्रिस्ती मत-प्रसाराच्या चळवळीपासून हिंदूंचा बचाव करण्याचा आटोकाट प्रयत्न झालेला आढळून येतो. विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी ` वेदोक्त धर्मप्रकाश ` हा ग्रंथ लिहून हिंदूधर्माचा बचाव केला. अशाप्रकारे तत्कालीन समाजात हिंदू व ख्रिस्ती या दोन धर्मामध्ये संघर्ष चालू होता. ख्रिस्तीधर्माच्या प्रचाराला बळी पडून काहींनी धर्मांतर केले. त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील अनिष्ट गोष्टीत सुधारणा घडवून आणण्याची प्रेरणा मिळाली. एकोणिसाव्या शतकाच्या या कालखंडात ख्रिस्तीधर्मप्रसाराची जी लाट उसळली तिने कित्येक सुशिक्षितांनाही स्तिमित करून सोडले. यातूनच हिंदू समाजामध्ये एक मोठी खळबळ माजून राहिली.

वर्णाश्रमधर्म हा भारतीय समाजजीवनाचा पाया होय. त्यामुळे आपल्या समाजात जातिभेदासंबंधीच्या कल्पना कित्येक शतके दृढमूल झालेल्या आहेत. त्यातूनच स्पृश्यास्पृश्यतेच्या अत्यंत वाईट कल्पना उदयाला आल्या. त्याच्याविरूध्दच ब्राम्हणांच्या सोवळ्या ओवळ्याच्या कल्पनाही या समाजात प्रखरतेने जाणवत होत्या. स्पर्शबंदी, रोटीबंदी, बेटीबंदी इ. नाना प्रकारांमुळे एकूण समाजालाच अवकळा प्राप्त झाली होती. जाती-विषयक उच्च नीचतेच्या कृतींनी समाज पछाडला गेला होता. दलितवर्ग

कायमचा दुर्दैवी होता. त्याच्या नशिबी आजन्म अपमान आणि पराभूत जिणे आले होते. अशा शूद्रांशी आणि शूद्रातिशूद्रांशी ख्रिस्ती मिशन-यांचा संपर्क एकोणिसाव्या शतकात आला. त्यामुळे आपली मनोव्यथा व्यक्त करण्याची संधी मिळाली. क्रमाक्रमाने जातिबंधने शिथिल होऊ लागली. वाङ्‌मयातून झालेला मतप्रचार आणि दळणवळणाची साधने ही दोन मुख्य कारणे याच्या पाठीशी होती. शिवाय शिक्षणामुळे ही जातिव्यवस्था शिथिल होऊ लागली. ख्रिस्ती प्रचारकांचे आपल्या धर्मावर उघडउघड हल्ले चालू झाल्यामुळे, हिंदूंमध्ये जागृती उत्पन्न होऊन आपल्या सा-या आचारविचारांचा व चालीरितींचा आमूलाग्र विचार करण्याचा, आत्मपरीक्षणात्मक प्रयत्न तत्कालीन समाजामध्ये सुरू झाला.

एकोणिसाव्या शतकामध्ये हिंदू धर्माला अवकळा प्राप्त झाली होती. अनेक वाईट प्रथा , परंपरा, रूढी यामुळे त्याला विकृतीचे स्वरूप आले होते. या समाजाला यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न तत्कालीन काही समाजसुधारकांनी केला. त्यासाठी त्यांनी अनेक सामाजिक संस्था स्थापन केल्या. हिंदूधर्मातील एकात्मवाद, बायबलातील नैतिकता व कुराणातील एकेश्वरवाद याचा पुरस्कार करून राजा राममोहन रॉय यांनी १८२८ साली ` ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. या समाजाने मूर्तिपूजा, बहुदेवतावाद इ. अनिष्ट रूढींना विरोध केला. मानवता, विश्वबंधुत्व व एकेश्वरवाद यांचा पुरस्कार केला. सवधर्मीयांनी एकाच प्रार्थनामंदिरात जमून बंधुभावाने प्रार्थना करावी असा आग्रह धरला. इंग्रजी भाषा व विज्ञान यांचा पुरस्कार केला. महाराष्ट्रात धार्मिक सुधारणा घडवून आणण्यासाठी डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या नेतृत्वाखाली सन १८६७ मध्ये ` प्रार्थनासमाजा ` ची स्थापना झाली. परमेश्वर एक आहे, परमेश्वराची मूर्तिपूजा करणे योग्य नाही, सगुण परमेश्वराची प्रार्थना अधिक उन्नतीसाठी केली पाहिजे, परमेश्वर

अवतार घेत नाही. इत्यादी तत्त्वांचा या समाजाने प्रचार व प्रसार केला. अवतार कल्पना व जातिभेद यांना या समाजाचा विरोध होता. स्त्री-शिक्षण, विधवापुनर्विवाह, बालविवाह बंदी इत्यादी सामाजिक सुधारणेसाठी या समाजाने प्रयत्न केले. एकोणिसाव्या शतकात आर्य-समाजाने हिंदूधर्माचे पुनरूज्जीवन व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचे कार्य केले. स्वामी दयानंद सरस्वतींनी न्या.रानडे यांच्या सहकार्याने १० एप्रिल १८७५ मध्ये आर्यसमाजाची स्थापना केली. वेदांचा अभ्यास सर्वांना करता येतो, परमेश्वराच्या निर्गुण निराकार व शुध्द स्वरूपाचे ज्ञान वेदांमध्ये असून वेदांचे अध्ययन करणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. एकेश्वरपंथाचा त्यांनी पुरस्कार केला. मूर्तिपूजा आणि पुराणे याना या समाजात स्थान नव्हते. जातिसंस्था त्यांना मान्य नव्हती. बालविवाह, समुद्रसंचार बंदी यांना त्याचा विरोध होता. विधवाविवाह, स्वधर्मात परत येण्यासाठी शुध्दीकरण यासारख्या प्रगमनशील विचाराचे त्यांचे तत्त्वज्ञान होते. अशाप्रकारे तत्कालीन समाजामध्ये समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक सामाजिक संस्था कार्यरत होत्या. त्यांनी महाराष्ट्रीय समाजामध्ये बरीच खळबळ माजविली होती. त्याचा अनकूल-प्रतिकूल परिणाम जनमानसावर होत होता. एतद्देशीय विचारवंत आपल्या धर्माचे आणि आपले आत्मपरीक्षण करू लागले होते.

आर्थिक जीवन :

देशाच्या सर्वांगीण प्रगती संबंधी निरनिराळ्या अंगांनी व विविध प्रकारांनी या काळात विचार झाला आहे. आपल्या एकत्र कुटुंब-पध्दतीमध्येच आमच्या मागासलेपणाचे मूळ आहे, याची जाणीव झाली. आर्थिकदृष्ट्या समाजाला भांडवलशाही वळण लावण्यासाठी जुन्या कल्पनांना मुरड घालण्याची आवश्यकता 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश' 'ज्ञानसंग्रह'

इत्यादी पत्रातून प्रतिपादन केली गेली. हिंदूंनी व्यापारात पडावे, नवनवीन उद्योग सुरू करावे, यंत्रांचा अधिकाधिक वापर करावा, व्यापारउदिमा- निमित्त अन्य देशांशी दळणवळण वाढवावे, हस्तव्यवसाय करावेत इ. विविध व्यावहारिक सूचना तत्कालीन नियतकालिकांतून प्रकट झाल्या आहेत.

रेल्वेसारख्या दळणवळणाच्या साधनामुळे व्यापार वाढला होता. सरकारी दरबारी नोकऱ्या मिळू लागल्या होत्या. त्यामुळे कारकुनी करणारा एक वर्ग तयार झाला होता. छापखान्यासारख्या गोष्टींचा शोध लागल्यामुळे एकूण जीवनातच आमुलाग्र बदल होऊ लागला होता. तात्पर्य एकोणिसाव्या शतकातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक जीवनामध्ये इंग्रजांच्या आगमनामुळे फरक पडू लागला होता. काही प्रमाणात नव्याचा स्वीकार होत होता. तर जुन्याचा धिक्कार होत होता, तर काहीवेळा जुन्याचे हिरीरीने समर्थन केले जात होते. स्त्रियांचे प्रश्न, जातिभेद, अनिष्ट रूढी, परंपरा याबद्दल आपल्या समाजातील विचारवंत पेटून उठले होते. या दोषावर आपल्या लेखणीच्या माध्यमा- तून कडाडून टीका करीत होते. या सर्वांचा परिणाम तत्कालीन जनमानसावर होणे अपरिहार्य होते. त्यामुळे एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सगळे सामाजिक जीवनच अशा अनेकविध विचारांनी ढवळून निघाले होते.

तत्कालीन समाजाचे एकंदरीत चित्र पहाता असे दिसून येते की, इंग्रजांनी सुरू केलेल्या आर्थिक शोषणाची जाणीव एतद्देशीय जाणत्या व्यक्तींना होऊ लागली होती. शेतीवरील सारा हा एकमेव उत्पन्नाचा मार्ग ब्रिटिशांच्या समोर होता. अज्ञान व मागासलेपणामुळे सामान्य शेतकरी दारिद्र्यातच पिचत पडला होता. 'हिंदुस्थान देशात दरिद्रता येण्याची कारणे', 'ग्रामरचना' इ. पुस्तकांतून लोकहितवादींनी इंग्रजी शोषण- नीतीवर बोट ठेवले होते. 'शेतकऱ्यांचा असूड' मधून म.फुल्यांनीही हा

प्रयत्न केला आहे. या काळामध्ये महाराष्ट्रातील शेतकरी भ्रामक, चालीरीती, धर्मभोळेपणा याखाली दबला होता. दारिद्र्य, मागासलेपणा, अज्ञान, कर्जबाजारीपणा यामुळे शेतकरी पिचून गेला होता. गोरे अधिकारी व ब्राह्मणलोक शेतकऱ्यांची लूट करीत होते. शेतकऱ्यांच्या या हलाखीचे दर्शन जोतीबा फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड' या ग्रंथातून पाहावयास मिळते. या शेतकऱ्यांना पोटभर भाकरही मिळत नव्हती. शेतकरी वर्ग हा तसा चातुर्वर्ण्य व्यवस्थेपासून उपेक्षित राहिलेला व आर्थिकदृष्ट्या पीडित, शोषित असा होता. सावकाराकडून त्याचे मोठ्या प्रमाणावर शोषण होत असे. जमीनदार तर सामान्य शेतकऱ्यांना अधिकच लुबाडत . अशा प्रकारे तत्कालीन समाजामध्ये शेतकऱ्यांची अवस्था फारच दयनीय होती. जोतिबांनी आपल्या ग्रंथातून शेतकऱ्यांच्या सुधारणेविषयी अनेक उपाय सुचविलेले आहेत. ब्रिटिशांनी शेतकऱ्यांच्या सुधारणेविषयी शाळा काढाव्या, दुष्काळाच्यावेळी शेतकऱ्यांना मदत करावी, कालवे व धरणे बांधून दुष्काळाला तोंड द्यावे, शेतातून जास्त उत्पन्न कसे मिळेल याचे शिक्षण द्यावे इत्यादी सूचना त्यांनी केला आहेत. तत्कालीन समाजातील शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती फारच बिकट होती हे यावरून दिसून येते.

## समारोप :

अशाप्रकारे इंग्रजी राजवटीतील महाराष्ट्राच्या समाजजीवनात बदल होऊ लागला. पाश्चात्य शिक्षण आणि ख्रिस्ती मिशनऱ्यांचे प्रयत्न यांच्यामुळे अज्ञानांधकारात झोपी गेलेला समाज खडबडून जागा झाला आणि आपल्या धर्माविषयी व संस्कृती विषयी परीक्षण करू लागला. या पाश्चात्यांच्या विचार प्रवाहात वाहात जाऊन काहींनी धर्मांतर केले. (बाबा पदमनजी) तर त्याचबरोबर या प्रवाहाला प्रतिबंध करण्यासाठी व संस्कृती आणि स्वधर्म यांचे रक्षण करण्यासाठी काही एतद्देशीय विचारवंतही

(विष्णुबुवा ब्रह्मचारी) पुढे सरसावले. यातून नव्याजुन्याचा संघर्ष सुरू झाला. त्यामुळे अनेक प्रश्न चर्चिले जाऊ लागले. स्त्रियांच्या बद्दल समाज-मनात थोडोफार सहानुभूती निर्माण झाली. तिच्या समान हक्काची जाणीव निर्माण झाली. विधवा विवाह, बालविवाह बंदी, बाला-जरठविवाह बंदी इत्यादी स्त्री विषयक सुधारणावादी विचार समाजात प्रस्तुत होऊ लागले. केशवपन, सती जाणे या सारख्या अनिष्ट रूढी कायद्याने तरी बंद झाल्या. स्त्री शिक्षणाविषयीचा नवा दृष्टिकोण उदयाला आला. शेतकऱ्यांचे प्रश्न सरकार समोर मांडले जाऊ लागले. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी, परंपरा, यांच्यावर पाश्चात्याकडून हल्ले होऊ लागले. 'ज्ञानोदय' सारख्या नियतकालिकाने हिंदू धर्मातील दोषांवर हल्ले करीत ख्रिस्तीधर्माचा प्रचार केला. पण त्यातूनही अप्रत्यक्षपणे समाज-सुधारणेला वेगच आला. एतद्देशीयांनीही या प्रवाह ओळखून आपल्या धर्मातील दोष नष्ट करण्यासाठी व समाजामध्ये विचारजागृती करण्यासाठी विविधज्ञानविस्तार, आर्यधर्म, उपदेशचंद्रिका, धर्मविचार सारखी नियत-कालिके काढली. तर काही विचारवंतानी ब्राम्होसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज या सारख्या संस्था स्थापन केल्या. ही नियतकालिके व सामाजिक संस्था तत्कालीन समाजामध्ये सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात कार्यरत होत्या. या सर्वांमुळे तत्कालीन महाराष्ट्रीय समाज जीवनाचे चित्र अगदी पालटून गेले होते. सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक जीवनात आमूलाग्र बदल होत होता.

))).(((

## प्रकरण दुसरे

### - संदर्भ -


१) जोग रा.श्री. `मराठी वाङ्.मयाचा इतिहास खंड ४ था, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, पृ.४०

२) रानडे गो.म. `महाराष्ट्रातील समाजविचार` सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-पुणे, प्रथमावृत्ती, जुलै १९७१, पृ.१०२

३) तत्रैव पृ.१०६

४) माळशे स.गं. `विधवाविवाह चळवळ` १८०० ते १९००, मुंबई, आवृत्ती पहिली, १८७८, पृ.८

५) रानडे गो.म. `महाराष्ट्रातील समाजविचार` सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर-पुणे, प्रथमावृत्ती, जुलै १९७१, पृ.९९

६) गुंजीकर रा.भि.` विविधज्ञान विस्तार`, पुस्तक ३, अंक ११, एप्रिल १८७१.

७) ब्रह्मचारी विष्णुबुवा, `वेदोक्त धर्मप्रकाश `आवृत्ती पहिली, १८५६ , पृ.४३७-३८

८) तत्रैव, पृ.४२२

९) रानडे गो.म. `महाराष्ट्रातील समाज विचार`
सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, पुणे,
प्रथमावृत्ती, जुलै १९७१, पृ.११६

१०) तत्रैव, पृ.११८

११) तत्रैव पृ.१५२

१२) तत्रैव, पृ.२३-३४

१३) दादोबा पांडुरंग - आत्मचरित्र
(संपा.) प्रियोळकर अ.का., के.भी.ढवळे प्रकाशन,
मुंबई, आवृत्ती पहिली, १९४७, पृ.६२

...